गाळयाची अंदाजित किमंत रुपये **(अक्षरी** **मौजा :**

FORM-IV

(See Regulation 20(i)(b))

<u>पंजीकृत डाकेने</u>

क्रमांक/नाम/मिव्य-२/वाटप/-------/२०१७,
कार्यालय, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर.

म्हाडा MHADA

<u>गाळा वाटप आदेश</u>

नागपूर,दिनांक : / /२०१७.

प्रति,

---,
---,
---,
---.

<u>विषय :</u> गाळे, अल्प उत्पन्न गट, नागपूर
या योजनेचे बांधण्यात आलेल्या गाळयाचे वाटपाबाबत.

महोदय/महोदया,

ज्याअर्थी, देकार पत्र क्रमांक ----------------------, दिनांक ------------- ने नमूद केलेल्या अटी व शर्तीचे पालन करण्याचे आपण कबुल केल्याने आणि ज्याअर्थि आपण देकार पत्रात नमुद केलेली रक्कम भरल्याने तसेच आवश्यक ते प्रतिज्ञापत्र सादर केल्याने या पत्राने आपणास असे कळविण्यात येते की, निवासी तळमजली गाळा क्रमांक एल- गाळे, अल्प उत्पन्न गट, नागपूर या योजनेत वितरीत करण्यात आला आहे.

आहे त्या स्थितीत, गाळा वाटपाकरीता तयार आहे. आपणास विनंती करण्यात येते की, आपण स्वतः १५ दिवसांचे आंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी योजनेच्या ठिकाणी उपअभियंता, बांधकाम उपविभाग-२, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर हयांना गाळयाच्या ताबा देण्याकरीता प्राधिकृत केले आहे, त्यांचे समक्ष उपस्थित राहून गाळयाचा ताबा घ्यावा.

सदर वाटप करण्यांत आलेल्या गाळयाचा मासिक भाडे खरेदी हप्ता प्रतिमाह रुपये हा अंदाजित दराप्रमाणे माहे पासून वर्ष ( ) हप्ते नियमितपणे प्रत्येक महिन्याचा शेवटच्या तारखेपर्यंत भरणा करावा लागेल. अन्यथा, थकित रक्कमेवर रुपये प्रतिमहिना दराने विलंब शुल्क आकारण्यात येईल. मासिक भाडे खरेदी हप्ता/विलंब शुल्काचा दर हा परिर्वतनिय असेल. आपणास मासिक भाडे खरेदी हप्ता बँक ऑफ महाराष्ट्र, सिताबर्डी शाखा, नागपूर या शाखेत अथवा मंडळाचे कार्यालय, नागपूर येथे कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी १०.३० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत भरणा करावा लागेल.

आपणास विनंती करण्यात येते की, आपण स्वतः १५ दिवसांचे आंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी योजनेच्या ठिकाणी उपअभियंता, बांधकाम उपविभाग, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर हयांना गाळयाच्या ताबा देण्याकरीता प्राधिकृत केले आहे, त्यांचे समक्ष उपस्थित राहून गाळयाचा ताबा घ्यावा.

Scanned by CamScanner

आपणास सदर गाळ्याचा कर (TAX) यांचे कार्यालयात त्यांचे मागणी प्रमाणे भरणा करावा लागेल. आपणास वाटप करण्यांत आलेल्या गाळ्यामध्ये विद्यूत प्रवाहाची जोडणी स्वखर्चाने करावी लागेल. गाळ्याचा ताबा घेतांना मंडळाचे संबंधीत अधिका-यांना ताबा पावतीवर स्वाक्षरी करुन तशी पावती द्यावी.

आपणास वाटप केलेल्या गाळ्याचा वापर स्वतः आपले कुटुंब यांच्या निवासी वापराकरीता करावयाचा आहे. उपरोक्त गाळा ताब्यात घेण्यासाठी तयार असून विनंती करण्यात येते की, गाळा वाटप आदेशावर नमूद केलेल्या किंमतीवर मुद्रांक शुल्क लावून सदर वाटप पत्र उपअभियंता, बांधकाम उपविभाग, नागपूर यांना ताबा घेतेवेळी मुद्रांक शुल्क लावलेल्या गाळा वाटप आदेशाची छायांकित प्रत उक्त अधिका-यास सादर केल्यास आपणास वाटप केलेल्या गाळ्याचा ताबा घेता येईल.

गाळ्याची अंतिम विक्री किमंत निश्चित झाल्यानंतर आपणास मंडळातर्फे रितसर अनुलग्न जमिनीचा भाडेपटटाकरार व गाळ्याचे विक्रीपत्र करुन देण्यात येईल.

आपला विश्वासू,

मिळकत व्यवस्थापक-२,
नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
ना ग पू र

पृष्ठांकन क्रमांक/नाम/मित्य-२/वाटप/-------/२०१५, नागपूर,दिनांक : / / २०१५.

१. उपअभियंता, बांधकाम उपविभाग, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर यांना विनंती असे की, संबंधीत गाळेधारक आपल्याकडे सदर गाळा वाटप आदेश घेवून आल्यास वाटप पत्रावर मुंद्राक शुल्क भरल्याची खातरजमा करुन त्यात नमूद केलेल्या गाळ्याचा ताबा त्यांना देवून ताबा दिल्याबाबतची ताबा पावती या विभागाला पाठवावी. तसेच १५ दिवसांत गाळेधारकाने गाळ्याचा ताबा न घेतल्यास त्याचा अहवाल या विभागाला कळवावा.

२. सहाय्यक/शाखा अभियंता, बांधकाम उपविभाग, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता.

३. लेखापाल/मुख्य भाडे वसुलीकार, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता. आपणास कळविण्यात येते की, आपण सदर गाळे धारकांकडून मासिक भाडे खरेदी हप्ता वसूली करण्यावर नियंत्रण ठेवावे.

४. कर अधिकारी, नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता.

मिळकत व्यवस्थापक-२,
नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
ना ग पू र

Scanned by CamScanner